बुधवार, दि १ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २९ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या लीज व्यवहारावर संशयाची छाया

## स्वतंत्र चौकशीची खासदार डॉ. कल्याण काळे यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य बँक बँक ऑफ महाराष्ट्राच्या पुणे येथील मुख्यालयाशी संबंधित लीज व्यवहारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या प्रकरणाची स्वतंत्र व वेळबद्ध चौकशी करण्याची मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांना सविस्तर पत्र पाठवले आहे.

**₹१११६ कोटींचा लीज व्यवहार चर्चेत**

खासदार डॉ. काळे यांनी पत्रात नमूद केले आहे की, बँकेने स्वतःच्या मालकीच्या जागेवरील मुख्य कार्यालय हलवून बाणेर पाषाण लिंक रोड, पुणे येथील भाडेतत्त्वावरील जागेत स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला आहे.

या अंतर्गत सुमारे १.२५ लाख चौरस फूट कार्यालयीन जागेसाठी १५ वर्षांची लीज करण्यात आली असून, यासाठी सुमारे ₹१११६ कोटी (व्याज परिणामासह) खर्च अपेक्षित आहे.

**'स्वतःची जागा असताना भाड्याने का?' खासदारांचा सवाल**

डॉ. काळे यांनी या निर्णयावर प्रश्न उपस्थित करत म्हटले आहे की, पुण्यात बँकेकडे स्वतःची जागा उपलब्ध असताना इतक्या मोठ्या खर्चाचा लीज व्यवहार करणे वित्तीय शहाणपणाच्या विरुद्ध आहे.

त्यांच्या मते, स्वतःच्या जागेवर फक्त ₹६० कोटी खर्च करून नवीन इमारत उभारणे शक्य होते. यामुळे बँकेला कायमस्वरूपी मालमत्ता मिळाली असती, दीर्घकालीन दृष्टीने मोठ्या प्रमाणात आर्थिक बचत झाली असती, निविदा प्रक्रियेवरही संशय. या व्यवहारात निविदा प्रक्रियेचे पालन झाले का, याबाबतही त्यांनी गंभीर शंका उपस्थित केल्या आहेत. त्यात पुढील मुद्द्यांचा समावेश आहे:

**पार्किंगची पुरेशी सुविधा उपलब्ध आहे का?** रेरा नियमांचे पालन झाले का?, कार्यालयासाठी आवश्यक सलग मजले मिळाले का?, कार्पेट क्षेत्राचे अचूक मोजमाप करण्यात आले का? फर्निचर व फिट-आउट खर्च योग्य आहे का? या सर्व बाबींची स्वतंत्र तांत्रिक व आर्थिक तपासणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

**सतर्कता यंत्रणेवर प्रश्नचिन्ह**



डॉ. काळे यांनी बँकेतील अंतर्गत सतर्कता यंत्रणा आणि मुख्य सतर्कता अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले आहेत.

लीज अंतिम करण्यापूर्वी आवश्यक ती दक्षता घेण्यात आली होती का? संभाव्य अनियमितता लक्षात आणून देण्यात अपयश का आले? याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. परदेशी गुंतवणूकदारांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष? पत्रात त्यांनी आणखी एक गंभीर मुद्दा मांडला आहे. परदेशात राहणाऱ्या भारतीय वंशाच्या गुंतवणूकदारांनी या व्यवहाराबाबत तक्रारी केल्या होत्या. मात्र, त्यावर अपेक्षित कारवाई न झाल्याने भारतीय बँकिंग व्यवस्थेच्या आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेवर परिणाम होऊ शकतो, अशी त्यांनी चिंता व्यक्त केली.

या प्रकरणात पुढील बाबींची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे: संपूर्ण व्यवहाराची स्वतंत्र केंद्रीय यंत्रणेमार्फत चौकशी, सेंट्रल विलीजन्स कमिशनच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन झाले का याची पडताळणी आर्थिक शिस्त आणि पारदर्शकतेचे निकष पाळले गेले का, अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे, व्हिसलब्लोअर्स संरक्षण आणि अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी खासदारांनी विशेषतः व्हिसलब्लोअर्सचे संरक्षण सुनिश्चित करण्यावर भर दिला आहे. तसेच, चौकशी अहवाल पारदर्शकपणे सार्वजनिक करण्याची मागणी करून जनतेचा विश्वास अधिक दृढ करण्याचे आवाहन केले आहे.

**सार्वजनिक निधीचा प्रश्न; तातडीच्या निर्णयाची गरज**

हा संपूर्ण विषय केवळ एका बँकेपुरता मर्यादित नसून, तो सार्वजनिक निधीची सुरक्षितता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांच्याशी थेट संबंधित आहे. म्हणूनच या प्रकरणावर तातडीने, निष्पक्ष आणि पारदर्शक निर्णय घेणे अत्यावश्यक असल्याचे डॉ. काळे यांनी स्पष्ट केले आहे. बँक ऑफ महाराष्ट्र च्या या लीज व्यवहारामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे मिळणे केवळ आवश्यकच नाही, तर सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांवरील विश्वास टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आता वित्त मंत्रालय आणि संबंधित यंत्रणा या प्रकरणात कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भाजपा जालना महानगर च्या वतीने महाप्रशिक्षण अभियान अंतर्गत निवासी प्रशिक्षण वर्ग संपन्न





**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीच्या संघटन बांधणीतील मौलाचा दगड ठरणाऱ्या पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियान-२०२६ अंतर्गत भाजपा जालना महानगरातील नवीन जालना, जुना जालना, पूर्व जालना व ग्रामीण मंडळांचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्ग साई लॉन्स, मंठा रोड, राममूर्ती जालना येथे नुकतेच संपन्न झाले. कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणाऱ्या या वर्गाचे उदघाटन भाजपा नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले, तर समारोप माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीत झाला.

यावेळी भाजपा नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, मंत्री आ. बबनराव लोणीकर, आ. भगवानदास सबनानी, जालना ग्रा.जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, माजी आ.कैलास गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या निवासी वर्गाचे वैशिष्ट्य म्हणजे कार्यकर्त्यांनी दोन दिवस एकत्र राहून पक्षाची विचारधारा आणि कार्यपद्धती समजून घेतली. उदघाटन प्रसंगी बोलताना रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, ''भाजपा हा केवळ राजकीय पक्ष नसून विचारांनी प्रेरित असलेले कुटुंब आहे, त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या क्षेत्रातील विकासकामांची अचूक माहिती ठेवून जनतेसमोर मांडली पाहिजे. संघटन मजबूत करण्यासाठी केवळ वरच्या पातळीवरचे नेतृत्व पुरेसे नसते, तर तळागाळातील कार्यकर्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर म्हणाले की, ''भारतीय जनता पार्टी हा अंत्योदयाचा विचार जपणारा पक्ष असून केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे ही कार्यकर्त्यांची मुख्य जबाबदारी आहे. ज्याचा बूथ मजबूत, त्याचा विजय निश्चित, हा मंत्र लक्षात ठेवून प्रत्येक कार्यकर्त्याने योजना दूत बनून काम करावे आणि विरोधकांच्या अपप्रचाराला विकासकामांच्या आकडेवारीने चोख उत्तर द्यावे.

या प्रशिक्षण वर्गात माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनीही वैचारिक आणि राजकीय दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात राजकारणातील बदलते स्वरूप, मतदारांच्या अपेक्षा आणि कार्यकर्त्यांची भूमिका यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, आजचा मतदार अधिक जागरूक झाला आहे. तो केवळ घोषणांवर विश्वास ठेवत नाही, तर प्रत्यक्ष काम आणि परिणाम पाहतो. गाव, वॉर्ड आणि बूथ स्तरावर सक्रिय कार्यकर्ते असतील तर कोणतीही निवडणूक जिंकणे शक्य होते. प्रत्येक कार्यकर्त्याने समाजातील सर्व घटकांशी संवाद वाढवून विश्वास निर्माण केला पाहिजे.''

महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी आपल्या भाषणात संघटनात्मक मजबुतीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. ते म्हणाले की, ''भाजप ही केवळ राजकीय पक्ष नसून विचार आणि कार्यपद्धतीवर चालणारी संघटना आहे. आगामी काळात प्रत्येक बूथ हा आपला सर्वात मजबूत किल्ला असला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक बूथवर सक्षम आणि पान २ वर

## दुबार मतदारांची नावे वगळण्यासाठी मॅपिंगला गती

# शनिवार-रविवारी विशेष शिबिरे; ५५% प्रक्रिया पूर्ण

**जालना । प्रतिनिधी -** मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याच्या दृष्टीने जालना शहरातील आणि तालुक्यात सुरू असलेल्या मॅपिंग प्रक्रियेला आता वेग देण्यात येत आहे. यासाठी प्रशासनाच्या वतीने प्रत्येक शनिवार व रविवारी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार छाया पवार यांनी दिली आहे.



मतदार यादीतील दुबार नावे, चुकीची नोंद आणि अपूर्ण माहिती ही लोकशाही प्रक्रियेसाठी मोठे आव्हान मानली जाते. यावर मात करण्यासाठी मॅपिंग प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. या प्रक्रियेमुळे एकाच व्यक्तीची एकापेक्षा जास्त ठिकाणी असलेली नावे शोधून काढून ती वगळली जाणार आहेत. त्यामुळे मतदार यादी अधिक स्वच्छ, अचूक आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

जालना शहरात आणि तालुक्यात सध्या या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत सुमारे ५५ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. उर्वरित प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने आता विशेष शिबिरांचा निर्णय घेतला आहे. या पान २ वर



**जालना येथे सेंट मेरीजवळ शाळेजवळ असलेल्या मोठ्या वृक्षाला ट्रकने धडक देऊन वृक्ष खाली पडले व त्यात दोघे मृत पावले ही घटना रात्री बारा साडेबाराच्या सुमारास घडली. ट्रक नंबर एम एच २२ ए एन ३३ ७२ आहे. (छायाचित्र किरण खानापुरे)**

## संपादकीय

# आकड्यांचा खेळ की विकासाचा खरा आराखडा?

जालना महानगरपालिकेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प मंजूर झाला असला, तरी या अर्थसंकल्पाभोवती निर्माण झालेली चर्चा केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून, ती शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. ४६८ कोटींच्या या भव्य अर्थसंकल्पात विकासाचे मोठे चित्र रंगवण्यात आले आहे; मात्र त्या चित्राची वास्तवाशी सांगड कितपत बसते, हा खरा प्रश्न आहे. अर्थसंकल्प म्हणजे केवळ उत्पन्न-खर्चाचा ताळेबंद नसतो, तर तो शहराच्या भविष्यातील वाटचालीचा रोडमॅप असतो. त्यामुळे त्यातील प्रत्येक आकडा हा विश्वासार्ह, वास्तववादी आणि अंमलबजावणीयोग्य असणे आवश्यक आहे. विरोधकांनी उपस्थित केलेला मुद्दा उत्पन्नाचे आकडे 'फुगवून' दाखवले जात आहेत हा केवळ राजकीय आरोप म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. जर मागील काही वर्षांत १४-१५ कोटींच्या आसपास असलेले कर उत्पन्न अचानक ८४ कोटींवर पोहोचत असेल, तर त्यामागील ठोस धोरण, सुधारणा आणि अंमलबजावणीची स्पष्ट दिशा प्रशासनाने मांडणे गरजेचे आहे. अन्यथा, अशा 'कागदी' आकड्यांवर उभा राहिलेला अर्थसंकल्प प्रत्यक्षात कोलमडण्याचा धोका निर्माण होतो. आणि त्याचा फटका थेट नागरिकांच्या मूलभूत सुविधांवर बसतो. कन्हैयानगर, नूतनवसाहत, चंदनझिरा यांसारख्या भागांमध्ये स्मशानभूमीसारख्या अत्यावश्यक सुविधांचा अभाव आजही जाणवत असेल, तर तो विकासाच्या दाव्यांना प्रश्नचिन्ह लावणारा आहे. शहराच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर केवळ रस्ते, गटारे आणि पाणीपुरवठा यापुरता विकास मर्यादित राहू शकत नाही. मुलांसाठी खेळाची मैदाने, नागरिकांसाठी उद्याने, स्वच्छता आणि आरोग्याच्या सुविधा हे सर्व विकासाचे समान घटक आहेत. या सर्वांचा समतोल साधणारा अर्थसंकल्पच खऱ्या अर्थाने 'विकासाभिमुख' ठरतो. याचबरोबर, सभागृहात पत्रकारांना प्रवेश नाकारण्याचा मुद्दा हा अधिक गंभीर आहे. लोकशाही व्यवस्थेत पारदर्शकता ही केवळ घोषवाक्य नसून ती कृतीतून दिसली पाहिजे. पत्रकार हे प्रशासन आणि जनतेदरम्यानचे महत्त्वाचे दुवा आहेत. त्यांना मर्यादित प्रवेश देणे म्हणजे माहितीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले जाऊ शकते. जर सर्व काही पारदर्शक आणि नियमांनुसार होत असेल, तर पत्रकारांच्या उपस्थितीची भीती का असावी? महानगरपालिका प्रशासनाने सुरक्षा आणि शिस्तीचे कारण दिले असले, तरी त्यामागे पारदर्शकतेचा अभाव दिसू नये, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. पत्रकारांसाठी गॅलरीची व्यवस्था हा तात्पुरता उपाय असू शकतो; मात्र लोकशाही मूल्यांना अनुसरून अधिक खुली आणि पारदर्शक व्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज आहे. एकंदरीत, जालना महानगरपालिकेचा हा अर्थसंकल्प 'मोठा' नक्कीच आहे, पण तो 'मजबूत' आहे का, हे येणारा काळ ठरवेल. आकड्यांचा आकार नव्हे, तर त्यामागील प्रामाणिकपणा, नियोजन आणि अंमलबजावणी यावरच शहराच्या प्रगतीचे भवितव्य अवलंबून आहे. आज गरज आहे ती केवळ अर्थसंकल्प मंजूर करण्याची नाही, तर तो जमिनीवर उतरवण्याची. अन्यथा, विकासाचे स्वप्न केवळ कागदावरच राहील आणि नागरिकांच्या अपेक्षा पुन्हा एकदा अपुऱ्या ठरतील.

# सर्व सामान्य जनतेला न्याय मिळेल काय ?

कोरोना काळात नागरिकांचे सर्वच बाजूनी अतोनात हाल झाले. सदर कोरोना काळाचा कटू अनुभव पाठीशी आहे. माणुसकीने वागण्याचे व एकमेकाला सहकार्य करण्याचा प्रसंग असून सुद्धा सर्वच क्षेत्रात गरज नसताना संधीचा फायदा उठवून व माणुसकीला काळिमा फासला. वस्तूंचे अव्वाच्या सव्वा दर वाढवून गरजू नागरिकांची लूटमार सुरू झाली.




अन्य देशात युद्ध सदृश्य प्रकार सुरु आहे. सरकारने पेट्रोल डिझेल चे दर प्रतिलिटर दहा रुपयांनी कमी केले. आपल्या देशात गॅस तुटवडा किंचित काळासाठी जाणवला. किती टक्के वाढ ह्याचा मागोवा घेतल्यास तो व्यापारी व ग्राहक सेवा दृष्टिकोनातून अगदी सहन करण्याजोगा आहे. अन्नधान्याचा तुटवडा नाही. असे असताना हॉटेल,छोटे फूड स्टॉल वर मिळणाऱ्या पदार्थांच्या किमतीत मात्र सर्व सामान्य जनतेला परवडणारे नाही असे दर लावून गरजू व हातावर पोट असणारे नागरिक वाढत्या किंमतीमुळे हवालदिल झाले आहेत. फूड स्टॉल, चहा टपरीवाले गॅस ब्लॅकने घ्यावा लागतो म्हणून किंमत वाढवली असे सांगतात. ते मात्र खोटे आहे. कारण आपल्याकडे गॅस चा तुटवडा नाही असे जबाबदार मंत्रीही सांगतात. आये हुवे मौके का फायदा उठाना और अपनी तिजोरी भरना अश्या पद्धतीं ने नागरिकांची लूट सुरु आहे. पदार्थांच्या किमती वाढविण्या बरोबर पदार्थांची साइजही कमी केली. हा हलकटपणाचा कहर झाला. हे लुटीचे प्रकार थांबवण्यासाठी स्थानिक नगरसेवक / आमदार खासदार / सामाजिक संस्था /अँजिओ / पालिका / पोलीस प्रशासन / अन्न नागरी पुरवठा खाते यांनी अश्या संधीसाधू लूटमार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. उदाहरण म्हणून नागरिकांनी सुद्धा बारा रुपयाला मिळणार वडापाव बारा रुपयातच घ्यावा. मेंदू वडा इडली,डोसा पोळी भाजी मिसळ पाव पाणी पुरी सामोसा सारखे अनेक पदार्थ हे पूर्वीच्याच भावात खरेदी करावे,त्यासाठी मन मारून ज्यादा पैसे देऊ नये. वाद झाला तरी चालेल. पोलिसांचे सहकार्य घ्यावे, पण अश्या

लूटमार करणार्यांना धडा हा शिकवलाच पाहिजे.म्हातारी मेल्याचे दुःख नाही परंतु काळ सोकावता कामा नये.

**यशवंत चव्हाण,**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**




# स्व.बाबासाहेब आकात स्मृती पुरस्कार नागराज मंजुळेंना जाहीर

**परतूर । प्रतिनिधी -** २०२६ सालचा शिक्षण व सहकार महर्षी स्व.बाबासाहेब भाऊ आकात स्मृती पुरस्कार प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माते नागराज मंजुळे यांना जाहीर झाला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या शुभहस्ते मंजुळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. येत्या ३ एप्रिल रोजी मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कपिल आकात यांच्या अध्यक्षतेखाली परतूर येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ.पंकजा वाघमारे, सुप्रसिद्ध कवी तथा गीतकार डॉ.दासू वैद्य, प्राचार्य डॉ. भागवत कटारे, प्राचार्य डॉ.शिवाजी मदन यांच्यासह मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा आशाताई आकात, उपाध्यक्ष डॉ. कुणाल आकात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ. मुंजा धोंडगे यांची प्रमुख उपस्थित असणार आहेत.

पान १ वरुन

## भाजपा जालना ...

सक्रिय बी.एल.ए. () नेमणे अत्यावश्यक आहे. मतदार यादीचे पुनरावलोकन () हे फक्त कागदोपत्री काम नसून ते संघटन विस्ताराचे सर्वात प्रभावी साधन आहे.'' ते पुढे म्हणाले की, ''प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या बूथमधील प्रत्येक मतदाराशी संपर्क ठेवला पाहिजे. नवीन मतदारांची नोंदणी, वगळलेल्या नावांची तपासणी आणि घराघरात जाऊन योजनांची माहिती देणे ही जबाबदारी गांभीर्याने पार पाडली पाहिजे. डिजिटल माध्यमांचा वापर करून संघटन अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे.

यावेळी वक्ते म्हणून माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, सुनील राणे, कैलास गोरंटयाल, भास्कर दानवे, मनोज पांगारकर, अमित देशपांडे, सुरेश केसापुरकर, बिकास प्रसाद, सिद्धिविनायक मुळे, ॲड. विपुल देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. तर सत्र अध्यक्ष म्हणून श्रीमती वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सौ. संगीताताई गोरंटयाल, रामेश्वर पाटील भांदरगे, युवानेते अक्षय गोरंटयाल, अनिल सरकटे, शुभांगीताई देशपांडे, सौ. सुषमाताई खरात, संजय एकनाथ डोंगरे, संजय भगत, सतीश जाधव, अर्जुन गेही यावेळी पदाधिकारी, नगरसेवक, शक्ती केंद्र प्रमुख बूथ इत्यादीसह सर्व मान्यवरांची उपस्थिती होती. सदरील अभियान यशस्वी करण्यासाठी अभियान प्रमुख वसंत शिंदे, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, महेश निकम, अमोल धानुरे, संजय डोंगरे इत्यादीसह सर्व नगरसेवक प्रमुख पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते या सर्वांनी परिश्रम घेतले.

## शनिवार -रविवारी ...

शिबिरांमुळे नागरिकांना त्यांच्या सोयीच्या दिवशी सहभागी होता येणार असून, प्रक्रिया अधिक जलद गतीने पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तहसीलदार छाया पवार यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, ''मतदार यादी ही लोकशाहीचा पाया आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या नावाची खातरजमा करून घ्यावी. शनिवार-रविवारी आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष शिबिरांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करण्यात सहकार्य करावे.''

प्रशासनाच्या या उपक्रमामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी अधिक अचूक आणि विश्वासार्ह होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यामुळे जालना तालुक्यातील नागरिकांनी या संधीचा लाभ घेत सक्रिय सहभाग नोंदवणे गरजेचे आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये

हनुमान जयंती म्हणजे हिंदू देवता हनुमान यांचा जन्मोत्सव होय. चैत्र महिन्यातील पौर्णिमा तिथीच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जन्मोत्सव साजरा केला जातो. या दिवशी हनुमानाच्या देवळात सूर्योदयाच्या आधीपासून कीर्तनाला प्रारंभ करतात. सूर्योदयाला हनुमानाचा जन्म होतो अशी कथा आहे, त्यानुसार कीर्तना नंतर सर्वांना प्रसाद वाटला जातो.
यंदा हनुमान जयंती गुरुवार, २ एप्रिल रोजी साजरी केली जाणार आहे. पंचांगानुसार, पौर्णिमेची सुरुवात १ एप्रिल रोजी सकाळी ०७ वाजून ०६ मिनिटांनी होत आहे तर २ एप्रिल रोजी सकाळी ०७ वाजून ४१ मिनिटांनी संपणार आहे. उदयतिथीनुसार चैत्र पौर्णिमा गुरुवार, २ एप्रिल रोजी आहे त्यामुळे हनुमान जयंती देखील या दिवशी असणार आहे. हनुमान जयंती हनुमान जन्मोत्सव म्हणूनही ओळखला जातो.
शनिवार आणि मंगळवार हे मारुतीचे वार मानले जातात. या दिवशी मारुतीला शेंदूर, तेल तसेच रुईची फुले आणि पाने अर्पण करण्याची प्रथा आहे. मारुतीला नारळ फोडण्याची रुढीही पूर्वापार चालत आलेली आहे.
हनुमान हा सप्त चिरंजीवांपैकी एक चिरंजीव आहे, म्हणजे तो अजूनही जिवंत आहे, अशी मान्यता आहे. ज्या ज्या ठिकाणी, रामाचे नाव घेतले जाते, तेथे मारुती हजर असतो, असे म्हणतात. अनेकांना याची प्रचिती आली आहे. या माहितीच्या आधाराने कवी तुलसीदासाने मारुतीला शोधून काढले.
हनुमान हे शक्ती, भक्ती आणि बुद्धीचे प्रतीक मानले जाणारे भगवान रामाचे निस्सीम भक्त आहेत. वानरराज केसरी आणि माता अंजनीचे पुत्र, तसेच वायुपुत्र म्हणून ओळखले जाणारे हनुमान, रामकथेत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. अखंड ब्रह्मचारी, चिरंजीवी आणि अफाट ताकद असलेले मारुती हे संकटातून मुक्त करणारे देव म्हणून पुजले जातात.
हनुमानाचा जन्म अंजनी मातेच्या पोटी अंजनेरी .नाशिक, महाराष्ट्र. येथे झाला, असे मानले जाते. त्यांना हनुमान, हनुमंत, मारुती, महावीर, बजरंगबली, पवनपुत्र, अंजनेय अशा अनेक नावांनी संबोधले जाते.
हनुमान हे भगवान श्रीरामांचे सर्वात मोठे भक्त आहेत. रामायणात त्यांनी लंकेत सीतेचा शोध घेणे, संजीवनी बूटी आणणे आणि लंकेच्या युद्धात महत्त्वाची भूमिका बजावली.
हनुमान हे ब्रह्मचारी आहेत आणि त्यांना अमरत्वाचे वरदान असल्यामुळे त्यांना चिरंजीवी मानले जाते.
चैत्र शुद्ध पौर्णिमेला हनुमान जयंती साजरी केली जाते, हा दिवस त्यांचा जन्मोत्सव म्हणून साजरा केला जातो.
हनुमानाची विशेष फलदायी मानली जाणारी १२ नावे खालीलप्रमाणे आहेत:
१. हनुमान (ज्याचे हनु/हनुवटी वज्रसदृश आहे), २. अंजनीसुत (माता अंजनीचा पुत्र), ३. वायुपुत्र (पवन देवाचा मुलगा), ४. महाबल (अत्यंत शक्तिवान), ५. रामेष्ट (प्रभू श्रीरामांचा लाडका किंवा प्रिय भक्त), ६. फाल्गुनसखा (अर्जुनाचा मित्र - अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर मारुती विराजमान होते), ७. पिंगाक्ष (तांबूस डोळे असलेला), ८. अमितविक्रम (ज्याचा पराक्रम अफाट आहे), ९. उदधिक्रमण (एका झेपेत समुद्र पार करणारा), १०. सीताशोकविनाशन (सीता मातेचे दुःख दूर करणारा), ११. लक्ष्मणप्राणदाता (संजीवनी बुटी आणून लक्ष्मणाचे प्राण वाचवणारा), १२. दशग्रीवदर्पहा (दहा तोंडे असलेल्या रावणाचा गर्व हरण करणारा),
रामाप्रती त्यांची निष्ठा आणि समर्पण अतुट आहे.
त्यांनी लहानपणी सूर्याला फळ समजून गिळण्याचा प्रयत्न केला होता, यावरून त्यांची अफाट शक्ती दिसते.
ते खूप बुद्धिमान आणि ज्ञानी आहेत, ज्याचा उल्लेख सुंदरकांडांत मिळतो अत्यंत शक्तिशाली असूनही ते नेहमी नम्र असतात.
हनुमानाची पूजा केल्याने व्यक्तीला धैर्य, शक्ती आणि आत्मविश्वास मिळतो, अशी श्रद्धा आहे.
मारुतीचा उल्लेख महाभारतातदेखील येतो. तो महाभारताच्या युद्धात दरम्यान अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर विराजमान होता.
झोपलेल्या मारूतीच्या मूर्ती काही ठिकाणी आहेत.
भारतात अशा आठ मूर्ती आहेत : १. भद्रा मारुती (खुलताबाद येथील घृष्णेश्वराच्या जवळ). २, अलाहाबादेत यमुनेच्या तीरावर (संगम घाटावर) ३, मध्य प्रदेशात जाम सावली येथे ४. राजस्थानमध्ये अलवर येथे ५. राजकोट ६. इटावा जिल्ह्यात पिलुआ गावात ७. चांदोली जिल्ह्यात आणि ८. छिंदवाडा येथे.
मारुती स्तोत्र हे मारुती तथा हनुमान या हिंदू देवतेची स्तुती करणारे काव्य होय.
या स्तोत्राची अनेक रुपे आहेत. त्यांपैकी समर्थ रामदासांनी लिहिलेले स्तोत्र महाराष्ट्रात प्रचलित आहे. याची सुरुवात भीमरूपी महारुद्र वज्र हनुमान मारुती... या पंक्तीने होते.
हनुमान चालीसा हे हिंदी भाषिक राज्यात लोकप्रिय असलेले, हनुमानाचे एक स्तोत्र आहे. या स्तोत्रात ४० कडवी आहेत
श्री गोस्वामी तुलसीदास यांनी श्री हनुमान चालीसाची रचना १६ व्या शतकात केली.
हे स्तोत्र दोहा आणि चौपाई स्वरूपातील ४० श्लोकांचे आहे, म्हणून तिला चालीसा असे म्हणतात.
समर्थ रामदास स्वामी यांनी महाराष्ट्रातील चाफळ आणि जवळच्या परिसरात सातारा, कराड, कोल्हापूर मध्ये ११ ठिकाणी मारुतीच्या मूर्त्यांना स्थापित केले. साधारणपणे दोन दिवसात या मारुती रायाचे दर्शन घेता येते.
कुठे आहे हे ११ मारुती ? बघूया...
चाफळचा वीर मारुती / प्रताप मारुती /भीममारुती
सातारा कराड चिपळूणकडून जाणाऱ्या फाट्याजवळ उंब्रज गावाजवळ चाफळ येथे रामाच्या देऊळासामोरी हात जोडून उभा दास मारुती आणि त्याच देऊळाच्या मागे प्रताप मारुतीची कृष्ण नदीच्या काठावर चुना, वाळू, ताग पासून बनवलेलीही मूर्ती स्थापिली आहे. ६ फुटी ही उंच मूर्ती रामाच्या समोर हात जोडून उभारल्या या मूर्तीचे नैत्र श्रीरामाच्या चरणाकडे स्थिर असल्याचे जाणवते. चाफळच्या रामाच्या देऊळाच्या मागे रामदासांनी बांधलेले हे देऊळ आजतायगत आहे. या देऊळातली मारुतीची मूर्ती भीमरूपी स्तोत्रामध्ये वर्णन केल्या सारखीच आहे. कमरेला सोन्याची कासोटी, किणकिणत घंटा, नेटका, सडपातळ डोळ्यातून अग्निवर्षाव होताना जाणवणे. मूर्तीच्या पायाखाली दैत्य आहे. चाफळ येथे मारुतीच्या दोन मुर्त्यांची स्थापना रामदासांनी केली असून दोन्ही मूर्तींचे रूप वेगवेगळे आहे.
माजगावचा मारुती
चाफळपासून ३ कि.मी. लांब एक गावात पाषाणाच्या रूपात असलेल्या दगडाला समर्थानी मारुतीचे रूप दिले. ५ फुटीची मूर्ती चाफळच्या राम मंदिराकडे तोंड करून उभारलेली आहे. आधीच्या कौलारू, माती विटाच्या देऊळाला जीर्णोद्धार करून नवे रूप देण्यात आले आहे.
शिंगणवाडीचा मारुती / खडीचा मारुती / बालमारुती
याला चाफळचा तिसरा मारुती देखील म्हणतात. शिंगणवाडीची टेकडी चाफळ पासून १ की.मी. च्या अंतरावर आहे. येथे रामघळ समर्थांच्या ध्यानाचे छोटेशे स्थळ आहे. येथे समर्थानी मारुतीची छोटीशी सुबक मूर्तीची स्थापना केली. ४ फुटी उंचीची उत्तरेकडे तोंड केलेली ही मूर्ती जिच्या डाव्या हातात ध्वजासारखी वस्तू दिसण्यात येते. सर्व ११ मारुतीच्या देऊळात हे सर्वात लहान देऊळ आहे. आजूबाजूच्या परिसरात घनदाट झाडे आहे. या देऊळाचा कळस तांबड्या रंगाने रंगविला आहे.
उंब्रजचा मारुती / मठातील मारुती
चाफळचे २ आणि माजगावातील मारुतीचे दर्शन करून परत उंब्रजला आल्यावर इथे जवळच ३ मारुती आहे. त्यातील हा एक उंब्रजचा मठातील मारुती. असंही आख्यायिका आहे की समर्थ चाफळवरून उंब्रजला दररोज स्नानेसाठी येत असत. तेव्हा एकदा ते नदीत बुडताना त्यांना स्वयं हनुमंतानेच वाचविले होते. समर्थांना उंब्रज मधील काही जमीन बक्षीस म्हणून मिळाली होती. तिथे समर्थानी मारुतीच्या देऊळची स्थापना करून चुना, वाळू आणि तागने निर्मित ही मारुतीची देखणी मूर्ती आहे. ह्या मूर्तीच्या पायाखाली दैत्य दिसतो.
मसूरचा मारुती
उंब्रजपासून १० की.मी. असलेले मसूर येथे मारुतीची स्थापना केली आहे. ५ फुटीची चुन्यापासून बनवलेलीही पूर्वाभिमुखी असलेली मारुतीची मूर्ती अतिशय सौम्य प्रसन्न असलेली मूर्तीच्या मस्तकी मुकुट, गळ्यात माळ, जानवं, कमरेला मेखला, पायाखाली जंबुमाळी नावाचा राक्षस दिसतो. सहा दगडी खांब्यावर देऊळाचे छत तोलून धरले आहे. मूर्तीच्या एका बाजूस शिवराम आणि दुसऱ्या बाजूस




समर्थांचे चित्र काढलेले आहे. या देऊळाचा सभामंडप १३ फूट लांबी रुंदीचा आहे.
शिराळ्याचा मारुती
सांगली जिल्ह्यात नागांसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव शिराळे याचा एसटी स्टॅन्डजवळ हे मारुतीचे देऊळ समर्थानी स्थापित केले आहे. हे देऊळ देखणे असून मारुतीची मूर्ती अतिशय भव्य आहे. ७ फुटी उंच ही मूर्ती चुन्याने बनवलेली आहे. ही मूर्ती उत्तराभिमुखी आहे. कटिवस्त्र आणि त्यातील गोंडा सुंदर असून कंबरपट्ट्यामध्ये घंटा बसविण्यात आला आहे. मूर्तीच्या डोक्याचा उजवी आणि डाव्या बाजूस झरोके आहे ज्यामधून सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी मूर्तीच्या तोंडावर प्रकाश पडतो. देऊळाच्या प्राकाराला दक्षिण दिशेस दार आहे.
शहापूरच्या मारुती
कराड मसूर रस्त्यावर १५ की.मी. च्या अंतरावर मसूरपासून ३ की.मी. अंतरापासून शहापूरच्या फाट्याहून १ की.मी. लांब हे मारुतीचे देऊळ आहे. ११ मारुती मधल्या मारुतीमध्ये सर्वात पहिले या मारुतीची स्थापना केली आहे. या मारुतीला चुन्याचा मारुती देखील म्हटले जाते. या गावाच्या एका टोकांवर नदीच्या काठाला मारुतीचे देऊळ आहे. देऊळ आणि मारुतीची मूर्ती दोन्ही पूर्वाभिमुखी आहे. ७ फुटाची ही मूर्ती काहीशी उग्र दिसते. या मूर्तीच्या पुढील पितळी उत्सव मूर्ती आहे. मारुतीच्या मूर्तीच्या मस्तकी गोंड्यांची टोपी आहे. येथून जवळच रांजण खिंड आहे. येथून २ दगडी रांजण दिसतात ह्याचा जवळच्या टेकडीवर समर्थांचे वास्तव्य असायचे.
बहे बोरगावचा मारुती
सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात बहे गावा जवळ बोरगांवामुळे त्याला बहे बोरगाव म्हटले जाते. इथल्या मारुतीच्या स्थापनेच्या मागे एक आख्यायिका आहे. ती रामायणाशी संलग्न आहे. रावणाचा वध करून श्रीराम अयोध्येला परतांना इथे बोरगावास वास्तव्यास होते. कृष्णानदीला त्यावेळी वाळवंट होते. श्रीराम संध्यास्नान करत असताना कृष्णेला पूर येतं तेव्हा मारुतीने आपले दोन्ही बाहू अडवून नदीच्या प्रवाहाला धरून ठेवले. ते प्रवाह दोन्ही बाजूस विभक्त झाले. त्यामधून एक बेट तयार झाले. आणि या क्षेत्राला बहे असे नाव मिळाले.
या जागी मारुतीचे समर्थांना मूर्तिरूपात दर्शन झाले नाही तेव्हा त्यांनी डोहात उडी मारून मारुतीची मूर्ती त्या डोहातून काढून स्थापित केली. मारुतीचे दोन्ही हात पाणी अडविण्याचा पावित्र्यात दिसून येतात डोक्यावर मुकुट हात दोन्ही मांड्यांचा बाजूला धरलेले. अशी ही भव्य मूर्ती दिसते. इथे जाण्यासाठी कृष्णानदीच्या वरील पुलाच्या पश्चिमेकडील बंधाऱ्यावरून बेटावरून जावे लागते. नदीस पूर आल्यास इथे जाणे शक्य नसते.
मनपाडळेचा मारुती
मनपाडळे आणि पारगाव कोल्हापूर जिल्ह्यात पन्हाळगड -ज्योतिबाच्या परिसरात आहे. कोल्हापूर ते वडगाव वाठारपासून पुढे १४ की.मी.च्या अंतरावर हे मनपाडळे आहे. ११ मारुती पैकी सर्वात दक्षिणे दिशेस असलेल्या या मारुती देऊळाची स्थापना समर्थानी केली ५ फूट उंच असलेली ही साधी सुबक मूर्ती आणि देऊळ उत्तराभिमुखी आहे. मूर्ती जवळ दीडफुटी उंच कुबडी ठेवलेली आहे. जवळपास ओढ्या काठी सुंदरसे कौलारू देऊळ आहे. औरसचौरस असलेल्या गाभाऱ्याचे ह्या देऊळात नवीन बांधकाम केलेले सभामंडप देखील आहे.
पाडळी मारुती
वारणेच्या खोऱ्यात असलेल्या मनपाडळे गावाच्या जवळच पाडळी गावात मारुतीची मूर्ती आहे.
पारगावाचा मारुती
यालाच बाळमारुती किंवा समर्थांच्या झोळीतला मारुती असे म्हणतात. कराड- कोल्हापूर रस्त्यावर वाठार गाव जवळ नव्या पारगावाजवळ जुने पारगाव आहे त्यात ही मारुतीची मूर्ती आहे. ११ मारुतींपैकी शेवटची आणि सर्वात लहान अशी ही मूर्ती सपाट दगडवर कोरलेली दीड फुटीची मूर्ती आहे. शेंदूर नसून केसांची शेंडी बांधलेली दिसते. मारुतीराया जणू डावीकडे धावत निघाल्याचा आविर्भावात ही कोरलेली आहे. मनपाडळे ते पारगाव अंतर ५ की.मी.चे असून वळसा घेलेला रस्ता आहे.
या ११ मारुती शिवाय समर्थांनी गोदावरी काठी, टाकळी येथे गोमयाचा मारुतीची स्थापना केली आहे. खामगाव जवळ नांदुरा येथे हनुमंताची एकशे पाच फूट उंच मूर्ती आहे. २००१ साली या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. या ठिकाणी खूप भाविक व पर्यटक दर्शनाला येत असतात .
एकदा तरी आपण ११ मारुतीचे,तसेच ईतरही मारुतीचे दर्शन घ्यावे. दर्शन करावे.
बलोपासनेचे महत्व सांगण्यासाठीच समर्थ रामदास स्वामींनी या अकरा मारुतीची स्थापना केली. तसेच श्रीरामा प्रति हनुमंताची असलेली निष्ठा होती तीच निष्ठा व भाव आपल्यातही उतरावा हाच त्यामागचा उद्देश होता. संकटकाळी हाच श्रद्धा भाव आपल्याला प्रेरणा देतो..
संकटमोचक हनुमंताला आपणही सतत येत असलेले संकट,नैसर्गिक आपत्ती निवारण्यासाठी प्रार्थना करु.
।।संकट कटै मिटे सब पीरा, जो सुमिरे हनुमत बलबीरा ।।
।। श्री हनुमतेय नमः ।।

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव, मोबा.८९९९५६६९१७**

# महावीर जन्मकल्याणकनिमित्त शोभायात्रेत उसळला जनसागर

## शोभायात्रेत प्रेम, शांतता आणि एकतेचं दर्शन; ठिकठिकाणी पुष्पवृष्टीने स्वागत

**जालना | प्रतिनिधी -** श्री भगवान महावीर यांच्या जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त सकल जैन समाजाच्यावतीने मंगळवार दि. ३१ मार्च रोजी काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेतील ''अहिंसा परमो धर्म, जिओ और जिने दो'' जयघोषाने जालना शहर दुमदूमून गेले. पांढऱ्याशुभ्र वस्त्रांमधील हजारो बांधव, भगिनी आणि चिमुकल्यांच्या उत्साहाने अवघी नगरी चैतन्याने न्हाऊन निघाली होती. ८ हजारावर समाजबांधवांच्या शिस्तबद्ध सहभागाने आणि जागोजागी होणाऱ्या पुष्पवृष्टीने या शोभायात्रेला एका भव्य सोहळ्याचे स्वरूप प्राप्त झाले; ज्याने संपूर्ण जालन्याचे लक्ष वेधून घेतले. उपमहापौर राजेश राऊत, नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनीही जन्मकल्याणक सोहळ्याला भेट देऊन समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.

### जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी दिल्या शुभेच्छा

भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी सकल जैन समाजाला आणि जिल्हावासीयांना शुभेच्छा दिल्या. भगवान महावीरांनी दिलेला अहिंसा, अपरिग्रह आणि समतेचा विचार आजही तितकाच प्रासंगिक आहे. जालन्यातील या भव्य शोभायात्रेतून दिसलेली शिस्त आणि एकता कौतुकास्पद असून, महावीरांच्या तत्त्वांचे पालन करून समाजात शांतता व सलोखा टिकवून ठेवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सकल जैन समाजाच्यावतीने प. पू. उपाध्याय विभजनसागरजी महाराज, पैसठिया छंद आराधिका करुणामूर्ती प. पू. किरणसुधाजी म. सा. जैन सिद्धांतचार्या प. पू. प्रशांतकवरजी म. सा. आणि प. पू. विभाश्रीजी म. सा. यांच्या मंगलमय सानिध्यात भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ८.३० वाजता भगवान महावीर चौक येथे संत-साध्वीच्या मांगलिकनंतर ध्वजारोहण करण्यात आले आणि त्यानंतर शोभायात्रेला प्रारंभ झाला. वाजत-गाजत, भजन, टाळ मृदंगाच्या गजरात निघालेल्या मिरवणुकीच्या अग्रभागी भगवान महावीर यांची पालखी, रथ, इंद्रध्वज होता. मॅजेस्टिक टॉकीज रोड, पाणी वेस, काद्राबाद, फुल बाजार, अहिंसा मार्ग, शोला चौक, जवाहर बाग, बडी सडक, श्रीराम मंदिर मार्गे येऊन या शोभायात्रेचा समारोप गुरु गणेशनगर येथे झाला. या मिरवणुकीमध्ये सहभागी पुरुषांनी श्वेत वस्त्र आणि महिलांनी लाल चुंदडी परिधान केली होती. अन्य समाजाच्यावतीनेसुद्धा मिरवणुकीचे ठिक-ठिकाणी स्वागत करण्यात आले. ठिक-ठिकाणी पाणी, शरबत, ताकाची व्यवस्था करण्यात आली होती.

या शोभायात्रेत सकल जैन समाजाचे अध्यक्ष महावीर रुणवाल, कार्याध्यक्ष संजय लव्हाडे, उपाध्यक्ष मनोज मोदी आणि ॲड. अनिल संचेती, महासचिव विजय जैन, सहसचिव चैतन्य वायकोस, मनोज मोदी, प्रमोद देसरडा, शिखरचंद लोहाडे, प्रवीण पहाडे, परेश धोका, ॲड. रोशन गोलेच्छा, लोहाडे, संतोष बडजाते, सुदेश सकलेचा, डॉ. धरमचंद गादिया, त्रिभुवन सिंघवी, विनोद धोका, अजीत छाबड़ा, राजेश पाटनी, जीनदास वायकोस, सुभाष वायकोस, विजय सावजी,कांतीलाल सेठिया, राजेश लुनिया, नरेंद्र पहाडे, संजय मुथा, प्रकाश बोथरा, अजय बोरा, गौतम संचेती, मनोज गंगवाल, महेंद्र पाटणी, विलास जैन, दर्पण सकलेचा, कन्हैयालाल पाटणी, पंकज




नेवे, सिद्धार्थ रुणवाल, रवींद्र संचेती, राजू पोरवाल, वीरेंद्र रुणवाल, दीपक मोदी, अशोक बिनायके, पंकज पाटणी, कचरूलाल कुंकूलोळ, गणेश काले, नरेंद्र जोगड, श्रीपाल मरलेचा, चेतन बोथरा, पंकज खिवंसरा, महेंद्र गादिया, आकाश कासलीवाल, शैलेश बडजाते यांच्यासह आठ हजारावर समाज बांधव सहभागी झाले होते.

शोभायात्रेच्या समारोपानंतर संत आणि साध्वींचे मंगलमय प्रवचन आणि त्यानंतर महाप्रसादी झाली.

# २ एप्रिलपासून रेवगाव येथे जडाई माता यात्रेला सुरुवात

**जालना | प्रतिनिधी -** तालुक्याजवळील रेवगाव येथील डोंगरावर वसलेल्या जडाई मातेच्या मंदिरात येत्या २ एप्रिलपासून वार्षिक यात्रेला सुरुवात होणार आहे. चैत्र पौर्णिमेनिमित्त भरत असलेल्या या यात्रेसाठी रेवगावसह परिसरातील अनेक गावांमधून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

नवसाला पावणारी देवी म्हणून जडाई मातेची ख्याती असून निसर्गरम्य डोंगर परिसरामुळे येथे भाविकांची कायम वर्दळ असते. यात्रेनिमित्त भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची, थंड पाण्याची तसेच सभामंडपाची व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रामपंचायत व विविध संस्थांकडूनही सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सुरेश कोल्हे मित्र मंडळाच्या वतीने यात्रेदरम्यान दिवसभर खिचडी वाटप करण्यात येणार आहे.

## टेंभुर्णी राम नवमीचा कार्यक्रम धूमधडाक्यात साजरा

# महाकाल अघोरी यांनी जिंकले उपस्थितांचे मन



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील गेल्या शेकडो वर्षापासून प्रभू रामचंद चे भव्य मंदिर असून येथील गावकरी यांच्या कडून येथे विविध कार्यक्रम घेतल्या जातात. सात दिवसांच्या मोठ्या कार्यक्रमानंतर शेवटी मोठा भंडारा करून सर्व गावकरी यांच्या साठी अन्नदांना चा मोठा कार्यक्रम पार पडला. गांवकरी यांच्या साठी शेवटी भव्य मिरवणूक काढून त्यात महाकाल अघोरी टीम मे हर हर महादेव म्हणून सर्व परिसर भक्तीमय करून टाकला होता.आंतरराष्ट्रीय हिन्दू परिषद व राष्ट्रीय बजरंग दलाच्या वतीने टेंभुर्णी शहरात प्रभु श्री राम नवमी च्या निमित्ताने भव्य दिव्य शोभा यात्रा काढण्यात आली होती.

शोभा यात्रे मध्ये महाकाल अघुरी चे जिवंत देखावे विशाल दंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केले.या शोभा यात्रेची सुरुवात प्रभु श्री राम मंदिरापासून करण्यात आली होती माळी गल्ली, खालचे बस स्टॉप, मेन रोड, मार्गे दत्तनगर भागातील श्री रेणुका माता मंदिरावर शोभा यात्रेची सांगता करण्यात आली.

सदर कार्यक्रमास भोकरदन जाफ्राबाद मतदार संघांचे आमदार श्री संतोष पाटील दानवे, जिल्हा परिषद सदस्य,श्री शालिकराम पाटील म्हस्के, सरपंच प्रतिनिधी गौतम म्हस्के यांच्या सह आंतरराष्ट्रीय हिन्दू परिषद व राष्ट्रीय बजरंग दलाचे सर्व कार्यकर्ते व सकल हिन्दू बांधव उपस्तिथ होते.या वेळी पोलिस मंडळी कडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# जालना शहरातील दलित वस्त्यांसाठी निधी वाढवा

## नगरसेविका दर्शना झोल-खोतकर यांची सभागृहात ठाम मागणी

**जालना | प्रतिनिधी -** महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय सभेत शहरातील दलित वस्त्यांच्या विकासासाठी अपुरा निधी दिल्याचा मुद्दा जोरदारपणे उपस्थित करत नगरसेविका दर्शना झोल-खोतकर यांनी प्रशासनावर निशाणा साधला. दलित वस्त्यांमधील प्रभागांचा विकास साधायचा असेल, तर त्या भागांसाठी स्वतंत्र आणि पुरेसा निधी राखीव ठेवणे अत्यावश्यक आहे, अशी ठाम भूमिका त्यांनी सभागृहात मांडली.

सभागृहात बोलताना दर्शना झोल-खोतकर म्हणाल्या की, दलित वस्त्यांच्या विकासाचा प्रश्न हा केवळ आर्थिक तरतुदींचा विषय नसून तो सामाजिक न्याय, समान संधी आणि मूलभूत हक्कांशी थेट जोडलेला आहे. शहरातील अनेक दलित वस्त्यांमध्ये आजही रस्ते, पिण्याचे पाणी, गटारे, स्वच्छता, वीज, आरोग्य सुविधा आणि इतर मूलभूत नागरी सुविधा अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. अशा परिस्थितीत अर्थसंकल्पात करण्यात आलेली निधीची तरतूद अत्यंत अपुरी असून, त्यामुळे या भागांचा विकास खुंटत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी पुढे सांगितले की, महानगरपालिकेने दलित वस्त्यांकडे केवळ कागदोपत्री विकासाच्या दृष्टीने न पाहता प्रत्यक्षात ठोस कामे करण्यासाठी निधी वाढवणे गरजेचे आहे. शहराचा सर्वसमावेशक विकास करायचा असेल, तर वंचित आणि दुर्लक्षित घटकांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. दलित वस्त्यांचा विकास झाला तरच शहराचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास साध्य होईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान आवास योजनेचा मुद्दाही सभागृहात उपस्थित

या वेळी त्यांनी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेला परंतु थांबलेला निधी हाही गंभीर विषय सभागृहात मांडला. शहरातील अनेक गरजू कुटुंबे आजही स्वतःच्या घराच्या प्रतीक्षेत असून, निधी वितरणात होणाऱ्या विलंबामुळे अनेकांची घरे अपूर्ण अवस्थेतच अडकून पडली आहेत, असे त्यांनी नमूद केले.



दर्शना झोल-खोतकर म्हणाल्या की, पंतप्रधान आवास योजना ही आर्थिकदृष्ट्या दुर्बल, वंचित आणि गरजू कुटुंबांसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. मात्र, मंजूर निधी वेळेत न मिळाल्यामुळे लाभार्थींना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. निधी थांबवणे किंवा विलंब करणे हे नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणारे आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा

सभागृहात त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली की, दलित वस्त्यांच्या विकासासाठी स्वतंत्र आणि वाढीव निधीची तरतूद करावी, पंतप्रधान आवास योजनेचा थांबलेला निधी तात्काळ वितरित करावा, प्रलंबित घरकुलांची कामे वेळबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत, विकासकामांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता ठेवावी, त्यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत सांगितले की, विकासाच्या मुख्य प्रवाहात सर्व घटकांना समान स्थान देणे हीच खरी लोकशाहीची ओळख आहे. त्यामुळे दलित वस्त्यांच्या प्रश्नांकडे केवळ औपचारिकतेने न पाहता, त्यावर तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

**सभागृहात आक्रमक भूमिका**

अर्थसंकल्पीय चर्चेदरम्यान दर्शना झोल-खोतकर यांनी हा मुद्दा आक्रमक पण अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडल्याने सभागृहात काही काळ या विषयावर गंभीर चर्चा रंगली. दलित वस्त्यांसाठीचा निधी वाढवण्याची मागणी ही केवळ राजकीय भूमिका नसून सामाजिक बांधिलकीची भूमिका आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सर्वसमावेशक विकासाची गरज

जालना शहराचा विकास केवळ मुख्य रस्ते, इमारती किंवा मोठ्या प्रकल्पांपुरता मर्यादित न राहता शहरातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. दलित वस्त्या, झोपडपट्ट्या, आर्थिकदृष्ट्या मागास भाग आणि घरकुलासाठी प्रतीक्षेत असलेली कुटुंबे यांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवूनच अर्थसंकल्प आखला गेला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.